# ।। निवासी सदनिकेचे खरेदीखत।।

दिनांक २४.०९.२०२६

मौजे.खेड शहर, ता.खेड, जि.रत्नागिरी येथील तसेच खेड नगरपरिषद यांचे हद्दीतील वार्ड नं.६ झोन नं.४ मधील "वारीया अपार्टमेंट" या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील टेरेस फ्लोअर प्लॅन मध्ये दर्शविलेला टेरेस असलेला निवासी सदनिका नं.३०१ ज्याचे क्षेत्र ९६०.०० चौ.फुट बिल्टअप (६६५ चौ.फुट सदनिका मिळकतीचे क्षेत्र व कारपेट क्षेत्र ४४०.०० चौ.फुट व ओपन टेरेस २९५.०० चौ.फुट) म्हणजेच एकुण क्षेत्र ८९.२१९ चौ.मी (बिल्टअप) त्यास खेड नगरपरिषद मालमत्ता क्रमांक KHED00002948 व मॅन्युअल मालमत्ता क्रमांक **064000756 (250/6-2-5)** असा आहे ज्यास आम्ही सदर ही निसावी सदनिका मिळकत तिसरा मजल्यावर आहे असे वर्णन दिलेले आहे, जो एकुण इमारतीचे दर्शनी बाजूस असलेला आहे त्याचे मालकी हक्काबाबत हे खरेदीखत आहे.

सदर निवासी सदनिका मिळकतीची सरकारी भावाने बाजार मुल्यदर तक्ते सूचने नुसार विभाग क्र. १/४ ड) वार्ड क्र.५ व ६ मधील म्यून्सीपल दक्षिण हददीकडील भाग विभागाच्या हददीत पश्चिमेकडील पाईपलाईन, दक्षिण व पूर्वेकडील म्यून्सीपल दक्षिण व पूर्व हददीचा भाग उत्तरेस स.नं.२०१, २०२, २०४, २०५ ची उत्तर हद्द स.नं.२०० ची दक्षिण हदद व पूजे बदामी नाल्यापासून कम्पोस्ट डेपो रस्ता पाईपलाईन नगर रचना रस्त्यास मिळेपर्यंत मिळकती यामधील निवासी इमारतीकरीता प्रति चौ.मी. चे दर रूपयात २९,८००/— प्रमाणे किंमत रक्कम रू.२६,६०,०००/— (अक्षरी रू.सव्वीस लाख साठ हजार मात्र) एवढी आहे.

सदर निवासी सदनिका मिळकतीची बाजार भावाने किंमत रक्कम रू. २६,६०,०००/— (अक्षरी रू.सव्वीस लाख साठ हजार मात्र) असून बाजार मुल्यदर तक्ते सूचने नुसार ... टक्के घसारा घेऊन सरकारी भावाने मिळकतीची किंमत रक्कम रू.............../— (अक्षरी रू.................मात्र) एवढी आहे.

मिळकतीचा मोबदला रक्कम रू.१३,२५,०००/— (अक्षरी रू.तेरा लाख पंचवीस हजार मात्र)

**क्र.मुद्रांक २०२१/अ.क्र. मुद्रांक—२०२१/अनो.सं.क्र.१०७/म—१(धोरणा) दिनांक ३१.०३.२०२१ प्रमाणे मुद्रांक शुल्कामध्ये १ टक्के मुद्रांक शुल्कात सुट अन्वये**

मुद्रांक शुल्क रक्कम रू.१,३३,०००/—(अक्षरी रू.एक लाख तेहतीस हजार मात्र)

नोंदणी शुल्क रक्कम रू.२६,६००/—(अक्षरी रू.सव्वीस हजार सहाशे मात्र)

तनझीम आसिफ चौगले
वय.३५ वर्षे, व्यवसाय.शिक्षक,
रा.किल्ला मोहल्ला, बाणकोट,
ता.मंडणगड, जि.रत्नागिरी.
आज रोजी खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी.
आधारकार्ड नं.४०५९ ६५८८ ८५९८.
पॅनकार्ड नं.AWTPC4694F

} खरेदीखत लिहून घेणार

यांसी.......

राबिया अब्दुल अजिज बहारून
वय.७५ वर्षे, व्यवसाय.गृहिणी,
आधारकार्ड नं.७४९० ९३८६ १९८१
पॅनकार्ड नं.DOMPB9345L
**यांनी दस्त निष्पादन केले असुन कबुली जबाब करीता**
दाऊद दुर्वेश म हुसैन पालेकर
वय.६० वर्षे, व्यवसाय.व्यवसाय,
रा.मु.पो.शिव बुद्रुक, ता.खेड, जि.रत्नागिरी.
आधारकार्ड नं.७६४३ ६४७९ ६८४१.
पॅनकार्ड नं.ARBPP0070H

} खरेदीखत लिहून देणार

**(या दस्तैवजात खरेदीखत लिहून देणार व खरेदीखत लिहून घेणार असा उल्लेख आहे त्या त्या ठिकाणी त्यांचे वालीवारस, ट्रस्टीज, असायनीज, एक्झीक्युटर्स, कुलमुखत्यारपत्र वगैरे सर्वाचा समावेश आहे असे समजण्याचे असून सदर दस्त हा त्यांचेवरही बंधनकारक आहे व राहील.)**

मी कारणे खरेदीखत लिहून देते की,

मौजे.खेड शहर, तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी येथील खेड नगरपालिका हद्दीतील बिनशेती जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | भुमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १. | २०२ | २/९ | ०—०६—० | ०.१० बिनशेती |

सदर जमीन मिळकतीस सिटीसर्व्हे रेकॉर्डप्रमाणे वर्णन.

| सि.टी.एस.नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|
| ३१८८/१२ | ६००.०० |

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन आहे.

**खरेदीखतातील मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे :—**

**वर नमुद जमीन मिळकतीमध्ये बांधलेल्या खेड नगरपरिषद यांचे हद्दीतील वार्ड नं. ६ झोन नं.४ मधील “वारीया अपार्टमेंट” या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील टेरेस फ्लोअर प्लॅन मध्ये दर्शविलेला टेरेस असलेला निवासी सदनिका नं.३०१ ज्याचे क्षेत्र ९६०.०० चौ.फुट बिल्टअप (६६५ चौ.फुट सदनिका मिळकतीचे क्षेत्र व कारपेट क्षेत्र ४४०.०० चौ.फुट व ओपन टेरेस २९५.०० चौ.फुट) म्हणजेच एकुण क्षेत्र ८९.२१९ चौ.मी (बिल्टअप) त्यास खेड नगरपरिषद मालमत्ता क्रमांक** KHED00002948 **व मॅन्युअल मालमत्ता क्रमांक 064000756 (250/6-2-5) असा आहे ज्यास आम्ही सदर ही निसावी सदनिका मिळकत तिसरा मजल्यावर आहे असे वर्णन दिलेले आहे, जो एकुण इमारतीचे दर्शनी बाजूस असलेला आहे त्याचे मालकी हक्काबाबत हे खरेदीखत आहे.**

**सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेस ही या खरेदीखताचा विषय आहे. येथून पुढे सदर दस्तात खरेदी देत असलेल्या सदनिका व ओपन टेरेस मिळकतीला “सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेस” असे संबोधले आहे. खरेदी देत असलेली निवासी सदनिका मिळकतीचा नकाशा या दस्ताबरोबर रेखांकीत करून दाखविलेला आहे.**

सदर निवासी सदनिका मिळकत क्रमांक ३०१ ची चतुर्थसीमा खालीलप्रमाणे आहे :—

पूर्वेस :— मुख्य दरवाजा व जीना.

पश्चिमेस :— समोरील मोकळी जागा.

दक्षिणेस :— मोकळी जागा.

उत्तरेस :— सदनिका क्रमांक ३०२.

येणेप्रमाणे सदर सदनिका मिळकतीची चतुर्थसीमा आहे.

वर नमुद जमीन मिळकत ही मुळात सौ.तस्नीम अ. लतीफ परकार यांचे मालकीची व वहिवाटीची होती.

**बिनशेती परवानगी :—**

वर नमुद जमीन मिळकत ही सौ.तस्नीम अ. लतीफ परकार हिने मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी, यांचे कडून दिनांक १६.०१.२००३ रोजीच्या हुकुम नं. क्र.म.शा.का. ३—४/एल एन अे/एस आर/३१४/०२ नुसार निवासी या अकृषिक कारणासाठी उपयोगात आणणेकरीता बिनशेतीकडे वर्ग करून घेतलेली आहे.

वर नमुद बिनशेतीकडे वर्ग केलेली जमीन मिळकत ही १. डॉ.सुनील नानालाल धारिया व २. डॉ.संजीव नानालाल धारिया यांनी सौ.तस्नीम अ. लतीफ परकार हिसकडून खरेदीखताद्वारे रक्कम रू.२,२०,०००/— मात्र मोबदल्यापोटी खरेदी घेतली होती. सदरचे खरेदीखत हे दिनांक ०८.१२.२००५ रोजी मा. दुय्यम निबंधक खेड यांचे कार्यालयात अनुक्रमांक ११९६/२००५ अन्वये नोंदविण्यात आलेले आहे.

सदर खरेदीखताचा अंमल त्यांनी रेव्हेन्यु रेकॉर्डला दिल्याने सदर मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईटला/अधिकार अभिलेख बदल होवून, फेरफार नोंद नं.९८९७ ही मंडळ अधिक्षक, खेड यांनी मंजुर करून, सातबारा सदरी १. डॉ.सुनील नानालाल धारिया व २. डॉ.संजीव नानालाल धारिया यांचे नाव मालक व भोगवटदार म्हणून दाखल करणेत आले. तसेच सिटीसर्व्हे रेकॉर्डला देखील नाव दाखल झाले.

तद्नंतर वर नमुद जमीन मिळकत ही एन बी एस डेव्हलपर्स प्रा. लि. नोंदणीकृत कंपनी तर्फे संचालक श्री.बशीर अहमद अब्दुल गफुर पटेल यांनी १. डॉ.सुनील नानालाल धारिया व २. डॉ.संजीव नानालाल धारिया यांस कडून खरेदीखताने विकत घेतली आहे.

सदरचे खरेदीखत हे मा. दुय्यम निबंधक खेड यांचे कार्यालयात दिनांक २०.०२.२००८ रोजी अनुक्रमांक २५३/२००८ अन्वये नोंदविण्यात आलेले आहे.

वर नमुद जमीन मिळकतीचा अंमल रेव्हेन्यु रेकॉर्डला देणेत आला आहे. त्याप्रमाणे फेरफार नोंद नं.१०२७२ ही मंजुर करून ती रेकॉर्ड ऑफ राईटला भिडविण्यात आली व सदर फेरफाराने एन बी एस डेव्हलपर्स प्रा. लि. नोंदणीकृत कंपनी तर्फे संचालक श्री.बशीर अहमद अब्दुल गफुर पटेल यांचे नाव सातबारा सदरी मालक व वहिवाटदार म्हणून दाखल करणेत आले. तसेच सिटीसर्व्हे रेकॉर्डला देखील नाव दाखल झालेले आहे. अशा प्रकारे एन बी एस डेव्हलपर्स प्रा. लि. नोंदणीकृत कंपनी तर्फे संचालक श्री.बशीर अहमद अब्दुल गफुर पटेल यांनी वर नमुद जमीन मिळकत सदर खरेदीखताने आपले ताब्यात व कब्जात घेतली आहे व ते मालक झालेले आहेत.

वर नमुद जमीन मिळकत खरेदी केल्यानंतर एन बी एस डेव्हलपर्स प्रा. लि. नोंदणीकृत कंपनी तर्फे संचालक श्री.बशीर अहमद अब्दुल गफुर पटेल यांनी वर नमुद जमीन मिळकतीत रहिवासी वापरासाठी इमारत बांधणेचे ठरविले. सदर एन बी एस डेव्हलपर्स प्रा. लि. अशी कंपनी आहे तिची कंपनी कायद्यानुसार व तरतुदीनुसार नोंदणी दिनांक १९.१२.१९९५ रोजी केलेली आहे. सदर कंपनीचे १. श्री.बशीर अहमद अब्दुल गफुर पटेल, २. सौ.हमीदा बशीर पटेल, ३. श्री. नुरूद्दीन बशीर अहमद पटेल, ४. श्री.बिलाल बशीर अहमद पटेल व ५. शकीला बशीर अहमद पटेल हे संचालक आहेत व अशा प्रकारे वर नमुद जमीन मिळकत ही सदर कंपनीचे मालकीची आहे.

**बांधकाम परवानगी :—**

वर नमुद जमीन मिळकतीत नियोजीत इमारत बांधण्यास मुख्य अधिकारी, खेड नगर पलिका, ता.खेड, जि.रत्नागिरी यांनी दिनांक २६.०६.२००८ रोजी जा.क्र.७४६/०८—०९ ने परवानगी दिलेली आहे.

वर नमुद जमीन मिळकतीत एन बी एस डेव्हलपर्स प्रा. लि. नोंदणीकृत कंपनी तर्फे संचालक श्री.बशीर अहमद अब्दुल गफुर पटेल ही एका इमारतीचे बांधकाम करत असुन, त्यास श्री.बशीर अहमद अब्दुल गफुर पटेल यांनी “वारीया अपार्टमेंट” असे नाव देणेचे ठरविलेले आहे.

वर नमुद नियोजीत इमारतीचा नकाशा हा तळ अधिक पहिला अधिक दुसरा मजला, स्टिल्ट पार्किंगचे क्षेत्रासह मंजुर केलेला आहे.

सदर इमारतीचे स्टिल्ट पार्किंग क्षेत्रामध्ये दोन सदनिका, तर स्टिल्ट मजल्याचे वरील दोन मजल्यावर प्रत्येकी चार सदनिका व शेवटच्या मजल्यावर टेरेस असलेले दोन सदनिका अशा प्रकारे रहिवासी वापरासाठी एकुण १२ सदनिका नियोजीत इमारत बांधली असुन सदर सदनिका हे सेल्फकंटेट असे असतील.

एकुण इमारतीचे दर्शनीकडील भाग हा स्टिल्ट पार्किंग आहे. तर मागील भागामध्ये दोन सदनिका आहेत. स्टिल्ट पार्कींगचे क्षेत्रास तळमजला, तर त्यावरील दोन मजल्यांना प्रथम व दुसरा मजला, तर शेवटचे मजल्याला तिसरा मजला असे वर्णन दिलेले आहे. म्हणजेच नगरपालिकेचे मंजुरीप्रमाणे व एन बी एस डेव्हलपर्स प्रा. लि. नोंदणीकृत कंपनी तर्फे संचालक श्री.बशीर अहमद अब्दुल गफुर पटेल यांनी दिलेल्या वर्णनाप्रमाणे १. स्टिल्ट पार्किंगचे क्षेत्र — तळमजला, २. तळ मजला — प्रथम मजला, ३. प्रथम मजला — दुसरा मजला व ४. दुसरा मजला व टेरेस फ्लोअर प्लॉन — तिसरा मजला असे संबोधणेचे आहेत तर नगरपालिकेचे मंजुरीप्रमाणे इमारतीचे मागील भागास १. तळ मजला, २. प्रथम मजला व ३. दुसरा मजला असे वर्णन आहे. म्हणजेच मागील बाजुचे मजल्यामध्ये आम्ही कोणतेही बदल केलेला नाही.

अशा प्रकारे एन बी एस डेव्हलपर्स प्रा. लि. नोंदणीकृत कंपनी तर्फे संचालक श्री. बशीर अहमद अब्दुल गफुर पटेल कंपनीने वर नमुद जमीन मिळकतीत रहिवासी वापरासाठी आर.सी.सी पध्दतीच्या इमारतीचे बांधकाम केलेले आहे त्याप्रमाणे श्री.बशीर अहमद अब्दुल गफुर पटेल यांनी नियोजीत इमारतीचे आर.सी.सी. चे सर्व काम पुर्ण केलेले आहे.

सदर इमारतीमधील सदनिका मिळकती विषयी व्यवहार करण्याचा श्री.बशीर अहमद अब्दुल गफुर पटेल यांना संपूर्ण व पुर्णपणे हक्क व अधिकार आहे. एन बी एस डेव्हलपर्स प्रा. लि. नोंदणीकृत कंपनी तर्फे संचालक श्री.बशीर अहमद अब्दुल गफुर पटेल कंपनी ही सदर इमारतीचे मालक आहे त्यामुळे सदर इमारतीतील सदनिका विकण्याचा अधिकार श्री. बशीर अहमद अब्दुल गफुर पटेल यांनाच आहे.

**मोबदला तपशिल :—**

सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेसबाबत खरेदीखत लिहून घेणार तनझीम आसिफ चौगले व खरेदीखत लिहून देणार राबिया अब्दुल अजिज बहारून यांचे दरम्यान रक्कम रू.१३,२५,०००/— (रक्कम रू.तेरा लाख पंचवीस हजार मात्र) या किंमतीस विकत घेण्याचे व देण्याचे ठरले असुन मोबदल्यापोटी खरेदीखत लिहून घेणार तनझीम आसिफ चौगले यांनी खरेदीखत लिहून देणार राबिया अब्दुल अजिज बहारून यांना दिनांक २४.०९.

२०२६ रोजी बँक ऑफ इंडिया शाखा वेसवी मधील खाते क्रमांक १४८५१०५१०००२८४२ मधुन धनादेश क्रमांक १४८३०१ अन्वये रक्कम रू.१,३५,०००/— (अक्षरी रक्कम रू.एक लाख पस्तीस हजार मात्र) चेकचे स्वरूपात तसेच दिनांक रोजी ICICI बँक शाखा रत्नागिरी मधील Demand Draft No.----------- अन्वये गृह कर्ज घेऊन रू. ११,९०,०००/— (अक्षरी रक्कम रू.अकरा लाख नव्वद हजार मात्र) अदा केलेले आहेत अशी मोबदल्यापोटी संपूर्ण एकुण रक्कम रू.१३,२५,०००/— (रक्कम रू.तेरा लाख पंचवीस हजार मात्र) अदा केलेली आहे.

सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेस मिळकतीच्या मोबदल्यापोटी असलेली संपूर्ण रक्कम रू.१३,२५,०००/— (रक्कम रू.तेरा लाख पंचवीस हजार मात्र) खरेदीखत लिहून घेणार तनझीम आसिफ चौगले यांनी खरेदीखत लिहून देणार राबिया अब्दुल अजिज बहारून यांना वरील प्रमाणे अदा केलेली असून येणेबाकी काहीही राहीलेले नाही तसे खरेदीखत लिहून देणार हे मान्य व कबुल करतात तसेच खरेदीखत लिहून देणार राबिया अब्दुल अजिज बहारून यांना मोबदल्यापोटी स्वतंत्र पावतीची आवश्यक्ता नाही.

सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेस ही माझी स्वकार्जीत मिळकत असुन सदर निवासी सदनिका मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, कब्जा नाही. सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेस कोणाकडेही तारण गहाण ठेवलेली नाही. सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेस ही खरेदीखत लिहून देणार हे त्यांना दिनांक १७.१२.२००९ रोजी दस्त क्र. १५४६/२००९ अन्वये रजिस्टर्ड खरेदीखताद्वारे प्राप्त झालेल्या सर्व अधिकार व हक्कांसह सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेस खरेदी देत आहेत.

येणेप्रमाणे सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेस तदंगभुत वस्तु इजमेंटचा हक्क यांजवर असलेला माझा सर्व हक्क संबध, तो तुम्हास खुष खरेदी वतन करून देऊन सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेस आज रोजी तुमचे प्रत्यक्ष ताब्यात व कब्जात दिलेली आहे व तिचा तुम्ही साक्षीदारांसमक्ष स्विकारही केला आहे तरी तिची वहिवाट तुम्ही आपले मर्जिप्रमाणे सरकार दस्त व कराचे देणे वारून पुत्र पौत्रादी, वंश परंपरागत अवलाद अफलाद पुर्ण मालकीचे निरंतर उपभोग करावा. या दस्तऐवजाने खरेदी दिलेली सदर निवासी सदनिका व ओपन टेरेस मिळकतीशी आता माझा, माझे वालीवारस, भाईबंद, ट्रस्टीज, असायनीस अगर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क दावा संबंध राहिलेला नाही किंवा राखुनही ठेवलेला नाही. खरेदी दिलेली सदर निवासी सदनिका मिळकत व

ओपन टेरेस मिळकतीच्या संपुर्ण हिश्याचे तुम्ही खरेदीदार मालक झाला असुन तिचा पुर्ण मालकी हक्काने निरंतर उपभोग करावा. सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेसचा असणारा विदयुत मीटर खरेदीखतानंतर खरेदीखत लिहुन घेणार यांचे नावे हस्तांतरण करणेचा आहे. त्यास वेळोवेळी खरेदीखत लिहुन देणार राबिया अब्दुल अजिज बहारून हे संमती देतील.

सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेसबाबत खरेदीखत लिहून देणार राबिया अब्दुल अजिज बहारून यांचे वालीवारस, भाईबंध, इस्टेटवारस हे कधीही व केव्हाही हरकत व अडथळा करणार नाहीत. भविष्यात खरेदीखत लिहून घेणार तनझीम आसिफ चौगले यांच्या सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेसबाबत खरेदीखत लिहून देणार राबिया अब्दुल अजिज बहारून व त्यांचे वालीवारस, भाईबंध, इस्टेटवारस यांनी हरकत केल्यास किंवा त्रास दिल्यास त्याचे खर्चासह निवारण खरेदीखत लिहून देणार राबिया अब्दुल अजिज बहारून या करून देतील.

सदर इमारतीमधील सोसायटीचे सभासद होणे तुमचेवर बंधनकारक राहील तसेच सोसायटीचा मेंटेनन्स व इमारतीचा मेंटेनन्स तसेच विद्युत मिटरचे बिल व अन्य सामाईक खर्च तुमचे हिश्यापुरता भरणे तुमचेवर बंधनकारक राहील. यापुर्वीचा नगरपरिषद कर, विद्युत बिल, इमारतीचा मेंटेंनन्स मी वेळोवेळी भरलेला आहे तसेच यापुढील सर्व कर, विद्युत बिल व मेंटेनन्स तुम्ही मालक म्हणून भरणेचा आहे.

खरेदीखत लिहून घेणार तनझीम आसिफ चौगले यांनी सदर निवासी सदनिका मिळकतीचा व ओपन टेरेसचा ताबा घेतल्यावर त्यांना सदर निवासी सदनिका मिळकतीमध्ये व ओपन टेरेसवर बेकायदेशिर कोणताही धोकादायक, ज्वालाग्राही किंवा इतर वस्तु जिच्यामुळे इमारतीला किंवा बाजुचे सदनिका धारकांना किंवा इतरांचे मालमत्तेवर इजा पोहोचेल अथवा कायद्याने मनाई आहे अशा वस्तुंची साठवण करणेची नाही हे खरेदीखत लिहून घेणार तनझीम आसिफ चौगले या मान्य करीत आहेत. खरेदीखत लिहून घेणार यांनी खरेदीखत नोंदवून पूर्ण झालेवर सदर निवासी सदनिका मिळकतीमधील व ओपन टेरेस मधील किरकोळ दुरूस्त्या स्वखर्चाने करणेच्या आहेत. तशा दुरूस्त्या अगर सुधारणा करताना इमारतीमधील इतर सदनिका धारकांना नुकसान पोहचेल असे कृत्य करणेचे नाही तसेच बांधकामामध्ये स्ट्रक्चरल चेंजेस करणेचे नाहीत तसेच फेरबदल करणेचे नाहीत तसेच खरेदी घेणार तनझीम आसिफ चौगले यांनी खरेदी दिलेल्या मिळकतीत सामाईक वापराच्या ठिकाणी स्वच्छता राखणेची आहे.

खरेदीखत लिहून घेणार यांनी खरेदी दिलेल्या सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेसचा ताबा घेतल्यावर सामाईक वापरात असणाऱ्या पाण्याचे तसेच विजेचे येणारे बिल, मासीक मेंटेनेन्स, सरकारी कर, ड्रेनेज, इलेक्ट्रीक मोटार दुरूस्ती, नगरपालीका कर, रंगरंगोटी, देखभाल इतर दुरूस्ती खर्च, साफसफाई वगैरे सर्व खर्च त्यांचे इतर सदनिका धारकांबरोबर आपल्या हिश्यावर येतील त्या प्रमाणे सोसायचे आहेत असे खरेदीखत लिहून घेणार तनझीम आसिफ चौगले मान्य व कबुल करीत आहेत.

खरेदीखत लिहून घेणार यांना सदर इमला/निवासी सदनिका मिळकत किंवा त्यापैकी कोणताही भाग विभाजन करण्याचा अधिकार राहणार नाही. सदरची संपुर्ण निवासी सदनिका व ओपन टेरेस मिळकत ही एकसंघ राहील असे खरेदीखत लिहून घेणार मान्य व कबुल करीत आहेत. इमारतीच्या व्यवस्थेसाठी व देखभालीसाठी अन्य सदनिका धारकांबरोबर सरकारी संस्था अथवा असोसिएशन स्थापन होण्यास तिचे सदस्य होणे/रहाणे व त्या संस्थेचे नियमांचे पालन करणे खरेदीखत लिहून घेणार तनझीम आसिफ चौगले यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

सदरहू तुम्ही आज रोजी खरेदी घेतलेली सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेस मी यापुर्वी दुसरे कोणासही गहाण, खरेदी, लीज, बक्षिस दिलेली नाही अगर तसा देण्याचा तोंडी अगर लेखी कराराही केलेला नाही तसेच त्याबाबत कोणतेही कोर्टात वाद चालू नाही व अद्यापपर्यंत तसा अस्तित्वात पण आला नाही. तुम्हास आज रोजी खरेदी दिलेली सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेस यापूर्वी कोणतेही सरकारी खात्याने, नगरपालीकेने अगर निमसरकारी कार्यालयांनी कोणत्याही कामासाठी ॲक्वायर अगर रिक्वीझीट केलेली नाही अगर यापुर्वी तशी नोटीसही मला आलेली किंवा प्राप्त झालेली नाही.

सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेसवर आज रोजी मी कोणत्याही प्रकारचा कर्जाचा बोजा केलेला नाही तसा तुम्हास आढळून आल्यास ते नुकसान मी भरून देईन, सदर निवासी सदनिका मिळकत व ओपन टेरेस तुम्हास बोजा विरहित खरेदी दिली आहे.

येणेप्रमाणे खरेदीखत उभयपक्षांनी आपापले मर्जीनुसार व पुर्णविचाराने व चांगले मन:स्थितीत असताना लिहून देवून त्यातील सर्व मजकूर वाचून तो खरा व बरोबर असल्याची खात्री पटलेवर जाणून उमजून आज रोजी खेड येथे खालील साक्षीदारांसमक्ष लिहून दिले आहे.

येणप्रमाणे खरेदीखत आहे.

ठिकाण : खेड

दिनांक : .....०९.२०२६

साक्षीदार : सही/—

______________________

**खरेदीखत लिहून देणार**

राबिया अब्दुल अजिज बहारून

______________________

**खरेदीखत लिहून घेणार**

तनझीम आसिफ चौगले